# बृहन्मुंबई महानगरपालिका

शेठ व्ही.सी.गांधी आणि एम.ए.व्होरा महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय, राजावाडी, घाटकोपर (पू.), मुंबई – ४०००७७.

**क्र. एचओ/आरजीएच/१०३३३/आस्था - ०१ दिनांक: ०५ /०८/२०२४**

## सूचना

राजावाडी रूग्णालयाच्या आस्थापनेवरील रिक्त "**प्रयोगशाळा तंत्रज्ञ**" या संवर्गाची पदे कंत्राटी तत्वावर भरण्याकरिता खालील अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

- **भरावयाची एकूण पदे** :- ०७
- **मानधन** :- रू.२०,०००/-
- शैक्षणिक अर्हता :-
  १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाची विज्ञान शाखेतील (Degree in B.Sc.) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापिठाची (MSBTE) डी.एम.एल.टी. / पी.जी.डी.एम.एल.टी. पदविका उत्तीर्ण असावा.
  २) संगणक ज्ञान (एम.एस.सी.आय.टी.परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.)
  ३) मराठी परिक्षा १०० गुणांची उत्तीर्ण असावे.
- **अर्ज करण्याचा कालावधी** :- दि.०५.०८.२०२४ ते दि.१२.०८.२०२४
- **मुलाखतीचा दिनांक** :- दि.१४.०८.२०२४ सकाळी ११.०० वाजता

अर्जदारांनी अर्ज दि.०५.०८.२०२४ ते दि.१२.०८.२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत राजावाडी रूग्णालय, घाटकोपर (पूर्व) येथे सादर करावयाचे आहेत. सदर दिनांका नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारत घेतले जाणार नाहीत. मुलाखतीस मूळ प्रमाणपत्र सोबत असणे आवश्यक याची नोंद घ्यावी. (**अर्जा सोबतची कागदपत्रे साक्षांकीत केलेली असावीत.**)

सदर नियुक्ती **निव्वळ कंत्राटी तत्वावर सहा महिन्यांच्या** कालावधीकरिता अथवा सदर पदांवर कायम तत्वावर उमेदवार प्राप्त होईपर्यंत या पैकी जे अगोदर असेल एवढ्या कालावधीसाठी असेल. त्यांना महानगरपालिका कर्मचा-याप्रमाणे सेवेचे इतर कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.

**अटी व शर्ती** सोबत जोडल्या आहेत.

सही/-

**वैद्यकीय अधिक्षक**

राजावाडी रूग्णालय, घाटकोपर

Rojgar Marathi

**अर्हता –**

- उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेतील (Degree in B.Sc) पदवी धारण करणारा असावा आणि मान्यताप्राप्त विद्यापीठाची (MSBTE) ची /डी.एम.एल.टी. (D.M.L.T.) पदविका उत्तीर्ण असावा.(B.Sc. + D.M.L.T.)
- उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परिक्षा व तत्सम परिक्षा किमान १०० गुणांची प्रश्नपत्रीका असलेला मराठी विषय घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.
- उमेदवारास संगणक (MSCIT) एम.एस.सी.आय.टी.परिक्षा उत्तीर्ण आवश्यक आहे.

**कर्तव्य –**

- रूग्णाचे रक्त, लघवी, संडास इत्यादी नमुने जमा करणे.
- रक्ताच्या वेगवेगळ्या प्रकारच्या चाचण्या / तपास करणे तसेच प्रयोगशाळेतील इतर नित्य कामे करणे.
- स्वत: केलेल्या रक्त नमुन्याच्या तपासाला जसे रक्तगट तपास व त्याची इतर जुळवणी इत्यादींना जबाबदार राहणे.
- प्रयोगशाळेतील कामी येणा-या साधनसामग्री व उपकरणांची मागणी नोंदवही तसेच त्यासाठी लागणारी पक्की खतावणी तयार करणे.
- स्वाधीन केलेल्या उपकरणांची योग्य ती काळजी घेणे / देखभाल करणे.
- रोजच्या रोज केल्या जाणा-या तपासणीसाठी नोंदणी पुस्तक तयार करणे व त्यांची योग्य ती नोंद ठेवणे.
- प्रयोगशाळेतील काम करणा-या प्रयोगशाळा सहाय्यक, प्रयोगशाळा मदतनीस व नोकर वर्ग यांच्या कामावर देखरेख ठेवणे.
- वरिष्ठांनी आदेश दिल्याप्रमाणे प्रयोगशाळेशी निगडीत इतर कामे करणे.

प्रयोगशाळा तंत्रज्ञ या संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत सूचना फलकावर जाहिरात देऊन निवड प्रक्रियेद्वारे निव्वळ कंत्राटी तत्वावर खालील अटी व शर्ती सापेक्ष भरण्याचे प्रस्तावीत आहे.

**निवडीचे निकष –**

- शैक्षणीक अर्हतेच्या अंतिम वर्षाच्या गुणांच्या टक्केवारीनुसार उमेदवारांची निवड यादी तयार करण्यात येईल.
- प्रथम प्रयत्नात उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
- संबंधित विषयातील आवश्यक ती पदविका प्राप्त केल्यानंतर उमेदवरास अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.
- तरी विहीत अर्हता धारण करणा-या इच्छुक उमेदवारांची आपले अर्ज साक्षांकित केलेल्या प्रमाणपत्रांसह छायांकित प्रतीसह खालील ठिकाणी दि. ०५.०८.२०२४ पासून दि.१२.०८.२०२४ पर्यंत संध्याकाळी ०५.०० वाजे पर्यंत सादर करावे व त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

- **उमेदवारांनी अर्ज करावयाचे ठिकाण**
  **वैद्यकीय अधिक्षक, राजावाडी रुग्णालय**
  **घाटकोपर ,मुंबई -४०००७७.**

Rojgar Marathi

**अटी व शर्ती**

- कंत्राटी तत्वावर नियुक्त होणा-या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना महानगरपालिकेच्या नियमित सेवेसाठी हक्क सांगता येणार नाही.
- कराराच्या कालावधीत कंत्राटी पध्दतीवरील प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा सादर करावे लागेल.
- प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना प्रति माहे रू.२०,०००/- प्रति महिना मानधन देण्यात येईल. त्यांना अन्य कोणत्याही प्रकारचे भत्ते दिले जाणार नाहीत.
- तसेच सदर पदे विशिष्ट कालावधीसाठीच असून सदर पद कालावधी संपल्यानंतर संपुष्टात येईल.
- नेमणुकीच्या विहित कालावधीत विवक्षीत काम पूर्ण करण्याची जबाबदारी नियुक्त केलेल्या प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांची राहील.
- कराराच्या कालावधीत संबंधित प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीमधील नियम लागू राहणार नाही. ही नेमणूक निव्वळ कंत्राटी पध्दतीवर असेल.
- कंत्राट पध्दतीचे काम करणा-या प्रयोगशाळा तंत्रज्ञांचे काम कराराच्या कालावधीमध्ये जर असामाधानकारक असेल तर अशा प्रयोगशाळा तंत्रज्ञांची कंत्राट पध्दतीवरील नियुक्ती, कोणतीही पूर्व सुचना न देता संपुष्टात आणण्यात येईल.
- निवड प्रक्रीया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्यांची कंत्राटी नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
- निवड झालेल्या उमेदवाराला नियुक्तीनंतर मंबई महानगरपालिका (सेवा) नियम १९८९ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा वर्तणूक नियम १९९९ लागू होणार नाहीत.
- सदर कंत्राटी पध्दतीचा कालावधी फक्त ६ महिन्याचा राहील. (प्रत्येकी ४५ दिवसानंतर १ दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.)
- कंत्राट कालावधीत काम करणा-या उमेदवारांची सेवा तात्पुरत्या स्वरूपात असल्याने त्यांची सदर सेवा सेवाजेष्ठतेसाठी विचारात घेतली जाणार नाही किंवा सदर सेवेला सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही. तसेच त्यांची सेवा त्यांना पूर्वसूचना न देता संपुष्टात आणण्याचे अधिकार प्रशासनास राहतील.

Rojgar Marathi